पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड.

I.O भत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0474 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/09/2025 22:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 18/09/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/09/2025
**Time From (वेळेपासून):** 15:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/09/2025 **Time (वेळ):** 22:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 039
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/09/2025 22:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1.5 किंमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कषी कलनी,बीड, बीड,बीड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ललीता हनुमान जावळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | धानोरा रोड,कषी कलनी,बीड,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | धानोरा रोड,कषी कलनी,बीड,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8975761115

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोविंद सुखदेवराव शेळके | | वडील का नाम : सुखदेवराव | 1. धारवंटा,गेवराई,चकलाम्बा,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय, बीड
दिनांक-20/09/2025

मी सौ.ललीता हनुमान जावळे, वय-42 वर्ष, व्यवसाय-नोकरी, मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शाळा गाढेवाडी ता.गेवराई जि.बीड सध्या कार्यरत जि.प.प्रा.शाळा वायकर वस्ती, केंद्र पिंपळवाडी ता.जि.बीड रा.कृषी कॉलनी, धानोरा रोड, बीड. मो.क्र.8975761115 आधार कार्ड क्र.4530 230701.
मी दि.18/09/2025 रोजी कोळगाव शिवार ता.गेवराई जि.बीड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन श्री. राहुलकुमार भोळ, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष तक्रार दिली होती की, " माझे विरुध्द दिनांक 26/08/2025 रोजी गाढेवाडी येथील जिल्हा परीषद शाळेत आर्थीक अनियमीतता व अतिरीक्त वेतन फरक देयक अदा झाले आहे का ? या कारणावरुन मला गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांची चौकशीची नोटीस व्हाटसअॅपव्दारे दिनांक 26/08/2025 रोजी प्राप्त झाली. सदरच्या चौकशी समिती मध्ये 1) श्री.मराठे एन. जि (केंद्रप्रमुख) 2) श्री.शेळके जि.एस.(केंद्र प्रमुख) 3) श्री.मोरे एस.एन.(केंद्रप्रमुख) असे सदस्य आहेत. सदर चौकशी समितीतील सदस्यापैकी केंद्र प्रमुख कोळगांवचे श्री.शेळके.जि.एस हे चौकशीचा अहवाल व्यवस्थीत पाठविण्यासाठी दिनांक 17/09/2025 रोजी जि.प.प्रा.शाळा गाढेवाडी येथे समक्ष येवुन मला सदर चौकशीचे अहवाला संदर्भाने कागदपत्र सादर करणे बाबत सांगीतले व वेळेत चौकशी सपंविण्यासाठी काही खर्च करावा लागेल असे म्हणाले त्यावरुन मला समजले की श्री.गोविंद शेळके हे मला लाचे संदर्भाने बोलत आहेत, त्यानंतर मी श्री. गोविंद शेळके यांना किती पैसे लागतील असे म्हणाले असता त्यांनी मला दिनांक 18/09/2025 रोजी जि.प.कें.प्रा. शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड येथे भेटण्यासाठी बोलावले आहे. " अशी वगैरे मजकुराची तक्रार दिली.
माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि/भोळ यांनी दि.18/09/2025 रोजी श्री.गोविंद शेळके, केंद्र प्रमुख, जि.प. कें.प्रा. शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड हे माझे चौकशीचा अहवाल व्यवस्थीत पाठविण्यासाठी माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्रमांक-1 श्रीमती कांबळे यांना जि.प. कें.प्रा.शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/भोळ यांनी मला व पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी पोनि/भोळ यांना कळवले की, माझ्याकडे स्कुटी नसल्याने मला आपल्या शासकीय वाहनामध्ये जि.प. कें.प्रा.शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड च्या काही अंतरावर सोडण्याची विनंती केली. त्यानंतर पोनि/भोळ यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझेकडे देवुन मला व पंच क्र-1 श्रीमती कांबळे यांना शासकिय वाहनाने श्री.गोविंद शेळके, केंद्र प्रमुख यांना भेटण्यासाठी जि.प.कें.प्रा.शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड चे काही अंतरावर अलिकडे सोडले. त्यानंतर मी व पंच क्र.01 श्रीमती कांबळे असे आम्ही पायी चालत जि.प.कें. प्रा.शाळा कोळगाव ता.गेवराई जि.बीड येथे गेलो. त्याठिकाणी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी मला पाहिल्यानंतर लागलीच शाळेचे ऑफीसचे बाहेर आले माझेत व केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांचेत माझे कामा संदर्भाने चर्चा झाली चर्चे दरम्यान " वेतनाचा मुद्दा क्लिअर झालाय सर, सगळं ते क्लिअर झालेलयं आपलं तपासणी जि होती शाळेची आता तुमच्याकडेच, तपासणीचं जे आहे आपलं " त्यावर केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी "कागदावर आणायचं नाही तुमच्या लक्षात आलं का, "असं देवुन टाकायचे त्यांना पाच इक हजार दया " असे म्हणुन स्वत: साठी व वरिष्ठाकरीता 5000/- रुपये लाचेची मागणी केली व बाकी सगळं एलपीसी त्यांच्यावर सहया लागतात आताच सह्या त्यांच्या लागतात त्याशिवाय रिलीव्ह होता येत नाही आपल्याला जे आऊट ऑफ गेलेत केंद्रातल्या केंद्रात. " असे सांगीतले त्यावेळी मी त्यांना "पाच हजार म्हणजे आता लगेच का" असे म्हणाले असता केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी आत्ता असतील तर दया नाहीतर मला टाकावे लागतील. असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना फोन पे नंबर बाबत विचाले असता केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी फोन पे असतील तर फोन पे दया असे म्हणाले

व लाचरक्कम 5000/- रुपयाची मागणी करुन लाचरक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी मला माझी बदली जि.प.प्रा.शाळा वायकर वस्ती, केंद्र पिंपळवाडी ता.जि.बीड येथे झाली असल्याने बदली ठिकाणी कार्यमुक्त होणे बाबतचे कागदपत्र सहा प्रतिमध्ये तयार करणे बाबत सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत काही अंतराव पायी आलोत. त्यानंतर पोनि/भोळ यांनी लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगीतले असता मी पोनि/भोळ यांना सांगीतले की माझी जि.प.प्रा.शाळा वायकर वस्ती, केंद्र पिंपळवाडी ता.जि.बीड येथे बदली झाली असल्याने बदली ठिकाणी कार्यमुक्त होणे व दि.19/09/2025 रोजी मला बदली ठिकाणी सकाळी हजर होणे आवश्यक असुन आपण सापळा कारवाई दि.20/09/2025 रोजी करणे बाबत विनंती केल्याने पोनि/भोळ यांनी सदरची सापळा कारवाई दि. 20/09/2025 रोजी आयोजीत करण्यात येणार असले बाबत सांगीतले. तसा पोनि/भोळ व पंचांनी दि. 18/09/2025 रोजी लाचमागणी पडताळणी पंचनामा केला आहे.

मी आज दि.20/09/2025 रोजी पोनि/भोळ यांना संपर्क करुन पुढील सापळा कारवाईचे आयोजन करणे असल्याने आपण बीड बायपास, बीड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन भेट घेणे बाबत विनंती केल्यावरुन आपण पंच व स्टाफसह सुरक्षीत ठिकाणी, बीड बायपास, बीड येथे हजर आले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असले बाबत सांगीतले असता मी पोनि/भोळ यांना विनंती केली की, सापळा कारवाईचे आयोजन करण्या आगोदर केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांना फोन करुन सापळा कारवाईसाठी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांचे भेटीचे ठिकाण निश्चीत करावे व फोन पे ने लाच रक्कम देणे बाबत खात्री करण्यात यावे. त्यावर पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन मी माझे मोबाईल वरुन केंद्र प्रमुख श्री. गोविंद शेळके यांना फोनवर संपर्क करुन स्पिकर ऑन करुन बोलले असता त्यांनी ते बीड येथे असल्याचे सांगीतले व ऑनलाईन पैसे न पाठवता ते पैसे घेण्यासाठी माझे कृषी कॉलनी येथील राहते घरी येतो असे सांगीतले त्यावरुन पोनि/भोळ यांनी पुढील सापळा कारवाईचे आयोजन कृषी कॉलनी, बीड येथील माझे राहते घरी करण्यात येणार असल्याचे कळवुन मी, पोनि/भोळ, पंच व सापळा पथक असे बीड बायपास बीड येथुन "सुमाई" कृषी कॉलनी, बीड येथील माझे घरी हजर आलो.

त्यानंतर पोनि/भोळ यांनी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन सापळा कारवाईसाठी अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला व पंचाना माहिति देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले तसेच मी हजर केलेल्या लाच रक्कम 5000/- रुपयास अँथ्रासीन पावडर लावुन सदरच लाचरक्क्म माझे पर्सचे कप्प्यामध्ये ठेवुन मला, सापळा पथक व पंचांना कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझे घरातील "बेडरुमचा दरवाजा उघडुन आत येणे " असा इशारा नेमुन दिला त्याबाबत दिनांक 20/09/2025 रोजी सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा केला आहे.

सापळा पुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझेकडे देवुन मला व पंच क्रमांक 1 श्रीमती कांबळे यांना माझे घराचे हॉलमध्ये थांबण्यास सांगीतले व पोनि/भोळ, पंच क्र.02 व सापळा पथक असे माझे घरातील बेडरुम मध्ये दरवाजा बंद करुन थांबुन राहीले. त्यानंतर काही वेळाने केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके हे माझे घरी आले. माझी व केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांची भेट झाली भेटी दरम्यान आमचे मध्ये माझ्या कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चेदरम्यान केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांना मी लाचरक्कम 5000/- रुपये माझे पर्सचे कप्प्यामधुन उजवे हाताने काढून समोर धरली असता केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी उजवे हाताने लाचरक्कम स्विकारुन शर्टचे समोरील डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावर मी मला लाच स्विकृती नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 15.25 वा. केला.
इशारा प्राप्त होताच पोनि/भोळ, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र.2 श्री.येवले हे तात्काळ घटनास्थळी हजर येवुन श्री.गोविंद शेळके, केंद्र प्रमुख यांना हॉल मध्ये पकडले. पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि/भोळ यांनी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्याठिकाणी पोनि/भोळ यांनी पंच क्र-1 श्रीमती कांबळे यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझे कडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्रीमती कांबळे यांनी सांगितले की, " केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम 5000/- रुपये उजवे हाताने स्विकारुन त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डावे बाजुचे खिशात ठेवली. " असा खुलासा पंच क्र.1 श्रीमती कांबळे यांनी केला. त्यावेळी केंद्र प्रमुख श्री. गोविंद शेळके हे घाबरलेले होते.
पोनि/भोळ यांनी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांना त्यांचे नाव, पद विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव गोविंद

सुखदेव शेळके, वय-56 वर्ष, व्यवसाय-नौकरी, केंद्रप्रमुख, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कोळगाव ता. गेवराई जि.बीड रा.धारवंटा ता.गेवराई जि.बीड (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/भोळ यांनी केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांना लाचरकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम अंगावर परिधान केलेल्या शर्टचे डावे बाजुचे समोरील खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी पंच क्र.2 श्री.येवले यांना केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके यांनी परिधान केलेल्या शर्टचे डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्र.2 श्री.येवले यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्रीमती कांबळे यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 श्री.येवले यांना वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री.येवले यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगीतले.
त्यावेळी पोनि/भोळ यांनी लाच रक्कम 5000/- रुपये पंच क्र.2 श्री.येवले यांना पुढील सुचनेपर्यंत ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी घटनास्थळावरील प्राथमिक कारवाई माझे घरी सुमाई, कृषी कॉलनी, बीड येथे पुर्ण करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/भोळ, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, केंद्र प्रमुख श्री.गोविंद शेळके असे शासकीय वाहनाने व मी माझ्याकडील स्कुटीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे हजर आलोत.
तरी दि.18/09/2025 रोजी 15.26 वा. ते 15.38 वा. चे दरम्यान जि.प.कें.प्रा.शाळा कोळगाव ता.गेवराई जि. बीड येथे श्री.गोविंद सुखदेवराव शेळके, वय-56 वर्ष, व्यवसाय-नौकरी, केंद्रप्रमुख, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कोळगाव ता.गेवराई जि.बीड रा.धारवंटा ता.गेवराई जि.बीड (वर्ग-3) यांनी माझे विरुध्द दिनांक 26/08/2025 रोजी गाढेवाडी येथील जिल्हा परीषद शाळेत आर्थीक अनियमीतता व अतिरीक्त वेतन फरक देयक अदा झाले आहे का? या कारणावरुन मला चौकशीची नोटीस व्हाटसअॅप व्दारे दिनांक 26/08/2025 रोजी प्राप्त झाली. सदरच्या चौकशी समिती मध्ये 1) श्री.मराठे एन.जि (केंद्रप्रमुख) 2) श्री.शेळके जि.एस.(केंद्र प्रमुख) 3) श्री.मोरे एस.एन.(केंद्रप्रमुख) असे सदस्य आहेत. सदर चौकशी समितीतील सदस्यापैकी केंद्र प्रमुख श्री.शेळके.जि. एस यांनी चौकशीचा अहवाल व्यवस्थीत पाठविणे करीता स्वत:साठी व वरिष्ठा करीता म्हणुन 5000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचरक्कम स्विकारण्याचे मान्य करुन दि.20/09/2025 रोजी 15.25 वा. लाचरक्कम 5000/- रुपये पंचासमक्ष सुमाई, कृषी कॉलनी,बीड येथे तक्रारदार यांचे घरी स्वत: स्विकारली असता केंद्रप्रमुख श्री.गोविंद शेळके यांना लाचेच्या रकमेसह पकडलेम्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**
Kishor Sundarsing Pawar(I (Inspector)) / PI **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठा.अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kishor Sundarsing P
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI